ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ३० वा ❑ भारतीय सौर दिनांक १६ फाल्गुन शके १९४७, शनिवार दि.०७ मार्च २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

वाईट विचारांना जाळून टाका; जीवनात आनंद मिळवा

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

होळी हा प्रेम, एकता आणि रंगांचा एक उत्साही सण आहे जो फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी वाईटावर चांगल्याचा विजय (होलिका दहन) साजरा केला जातो. वसंत ऋतूचे आगमन, बंधुत्व आणि तुटलेले नातेसंबंध सुधारण्याचे प्रतीक म्हणून हा सण साजरा केला जातो आणि तो गुलाल, मिठाई आणि उत्साहाने साजरा केला जातो.होळी हा केवळ रंगांचा सण नाही तर होलिका दहनद्वारे आपल्यातील वाईट, वाईट विचार, अहंकार आणि नकारात्मकता जाळून राख करण्याचा आध्यात्मिक उत्सव आहे.हे भक्त प्रल्हादाप्रमाणे चांगल्याच्या विजयाचे आणि देवाच्या भक्तीचे प्रतीक आहे. या पवित्र अग्नीत क्रोध, लोभ, आसक्ती आणि मत्सर सोडून द्या आणि जीवनात शांती, प्रेम आणि सकारात्मकतेचे नवीन रंग स्वीकारा.

मानसशास्त्रज्ञांच्या मते, यशाची गुरुकिल्ली म्हणजे प्रथम मत्सर, क्रोध, लोभ आणि भीती यासारखे नकारात्मक विचार ओळखणे. या होळीला, हे विचार सोडून देण्याचा संकल्प करा. नकारात्मकतेला सोडून देणे सोपे नाही, परंतु सरावाने सर्वकाही शक्य आहे. आध्यात्मिक तज्ञांच्या मते, जेव्हा एखादी व्यक्ती प्रत्येक क्षणी त्यांचे ज्ञान वाढवते आणि ते त्यांच्या कृतींमध्ये लागू करते तेव्हा यशाची सुरुवात होते. म्हणून, नकारात्मक विचारांना सकारात्मक विचारांनी बदला आणि कृतज्ञता, प्रेम आणि करुणा यासारखे गुण जोपासा.सकारात्मक दृष्टिकोन ठेवा, प्रत्येक परिस्थितीत सकारात्मक पाहण्याचा प्रयत्न करा.

मानवांमध्ये वाईटपणा प्रामुख्याने चुकीचे विचार, अहंकार, स्वार्थ आणि मत्सर यांपासून निर्माण होतो, जे कंडिशनिंग बनतात आणि वर्तनाचा भाग बनतात. हे बहुतेकदा इतरांना हानी पोहोचवण्याच्या किंवा इतरांची निंदा करण्याच्या प्रवृत्ती म्हणून प्रकट होते. तथापि, हे वाईट जन्मजात नसून परिस्थिती किंवा नकारात्मक विचारसरणीचा परिणाम असू शकते.

''मीच सर्वस्व आहे'' ही भावना मानवी विनाशाचे सर्वात मोठे कारण आहे. चोरी, हिंसाचार आणि फसवणूक यासारख्या कृती स्वार्थातून जन्माला येतात. इतरांच्या यशाचा मत्सर करणे आणि त्यांना हानी पोहोचवण्याचा विचार करणे. नकारात्मक विचार करण्याची क्षमता एखाद्याला प्राण्यांपेक्षा वेगळे आणि शत्रू बनवते. त्याच बरोबर इतरांबद्दल वाईट बोलण्याची किंवा त्यांना इतरांबद्दल वाईट बोलताना ऐकण्याची सवय. मानवांमध्ये चांगले आणि वाईट दोन्ही गुण असतात, परंतु एक लहान वाईट देखील शंभर चांगल्या गुणांपेक्षा जास्त असू शकते कारण ते विश्वास तोडते. चांगल्या मूल्ये, आत्म-जागरूकता आणि सकारात्मक विचारसरणीद्वारे या वाईटावर मात करता येते.

होळीच्या या शुभ प्रसंगी, स्वतःला आणि इतरांना चुकांसाठी क्षमा करायला शिका. क्षमा नकारात्मक भावना दूर करते आणि मन शांत करते, यशाच्या जवळ आणते. होळी अशी असावी आणि होळीचे रंग असे असले पाहिजेत, प्रेमाचा नशा इतका तीव्र असावा की दुसरा कोणताही रंग लावता येणार नाही.हा सण केवळ बाह्य रंगांचा नाही तर मनाला प्रेम आणि शांतीच्या रंगांनी भरण्याचा संदेश देखील देतो.

होळीचा खरा आनंद म्हणजे जेव्हा आपण आपल्यातील वाईट गोष्टी काढून टाकतो. होलिका दहन हे केवळ जळत्या लाकडाचे प्रतीक नाही तर ते आपल्या मनातील अहंकार, राग आणि नकारात्मकता दूर करण्याची संधी आहे.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातर्फे १० व ११ मार्चला जालना ग्रंथोत्सव

सांस्कृतिक कार्यक्रम भरगच्च उपक्रमांची राहणार रेलचेल

ज्योतिर्मय साहित्य

जालना – उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय मुंबई ,आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातर्फे दि.१० व ११ मार्च २०२६ या कालावधीत टाऊन हॉल स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात ''जालना ग्रंथोत्सव –२०२५'' चे आयोजन करण्यात आले असून दोन दिवस चालणाऱ्या या ग्रंथोत्सवात

ग्रंथ प्रदर्शन, विक्री, साहित्यिक मेळावा, परिसंवाद, सांस्कृतिक कार्यक्रम अशा भरगच्च उपक्रमांची रेलचेल राहणार असल्याची माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी चंद्रशेखर ठाकूर यांनी आज दिली.

वाचन संस्कृतीचा प्रचार ,प्रसार व्हावा या उद्देशाने आयोजित ग्रंथोत्सवात मंगळवारी (ता .१०) सकाळी १०.०० वा . ग्रंथ दिंडीचे गांधी चमन येथे महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत यांच्या हस्ते उद्घाटन होईल.यावेळी व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विनीत साहनी, सुनील लोणकर, प्रा.पंढरीनाथ सारके यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.



सकाळी अकरा वाजता पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते ग्रंथोत्सवाचे उद्घाटन होईल. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्रा.चंद्रकांत पोतदार हे राहतील. याप्रसंगी खा. डॉ.कल्याण काळे, खा.संजय जाधव, आ.विक्रम काळे, आ.सतीश चव्हाण, आ.राजेश राठोड, आ.अर्जुनराव खोतकर, आ.बबनराव लोणीकर, आ. नारायण कुचे, आ. संतोष पाटील दानवे, आ. हिकमत उढाण, जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, सहाय्यक संचालक सुनील हुसे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सुत्रसंचालन ॲड.सुशीलकुमार शेळके हे करतील.

दुपारी १२.३० ते ०१.०० या वेळेत शालेय विद्यार्थ्यांचा

''मी सावित्री'' हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर होईल.

दुपारी तीन ते पाच या वेळेत नांदेड येथील श्रीनिवास म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली ''बदलत्या काळात लोप पावत चाललेली वाचन संस्कृती'' या विषयावर परिसंवादात डॉ.राजेंद्र सोनवणे, डॉ.शशीकांत पाटील, राम रौनेकर, पांडुरंग सांगळे, कमलेश खिल्लारे यांचा सहभाग राहणार आहे. सुत्रसंचालन डॉ.प्रभाकर शेळके हे करतील.

बुधवारी (ता.११) सकाळी ११.०० ते १२.३० या वेळेत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीश बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली ''स्पर्धा परीक्षा काळाची गरज'' या विषयावर परिसंवादात शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात,उपशिक्षणाधिकारी संजय कायंदे, ,प्रा.राजेंद्र भोसले, यांचा सहभाग राहणार आहे . दुपारी १२.३० ते ०१.३० या वेळेत

शालेय विद्यार्थ्यांचा ''मी धर्मवीर ''या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण होईल.

दुपारी तीन ते चार या वेळेत ज्येष्ठ साहित्यिक संतोष तांबे यांच्या अध्यक्षतेखाली '' सामाजिक जडणघडणीत ग्रंथालय चळवळीचे योगदान'' या विषयावर परिसंवादात ज्येष्ठ पत्रकार गुलाब पाटील, मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष रवींद्र तौर, डॉ.राजशेखर बालेकर, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राजेश राऊत, जिल्हा ग्रंथालय असोसिएशनचे अध्यक्ष डी.बी.देशपांडे, मसापचे केंद्रीय संचालक सुभाष कोळकर, यांचा सहभाग राहणार आहे. सुत्रसंचालन देवीदास कोळकर हे करतील.

दुपारी ०४.०० वा.अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथोत्सवाचा समारोप होणार असून निवासी उपजिल्हाधिकारी शशीकांत हदगल, जिल्हा नियोजन अधिकारी सूचित कुलकर्णी, जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी, जिल्हा कोषागार अधिकारी पंजाब पुंडगे, शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात, पोलीस निरीक्षक जनार्दन शेवाळे, जिल्हा ग्रंथालय असोसिएशनचे अध्यक्ष डी .बी. देशपांडे, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राजेश राऊत, यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे सुत्रसंचालन प्रा.रंगनाथ खेडेकर हे करतील.ग्रंथोत्सवात प्राध्यापक, संशोधक, शिक्षक, विद्यार्थी, महिला, डॉक्टर, वकील, अभियंते, उद्योजक, व्यापारी, सर्व ग्रंथालयांचे संचालक, कर्मचारी, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी चंद्रशेखर ठाकूर यांच्या सह ग्रंथालय अधिकारी कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

मी आणि माझी कविता

ज्योतिर्मय साहित्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ – युवक विकास मंडळ आणि सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने प्रा. डॉ. वा.ल. कुलकर्णी व्याख्यानमालेत प्रा. इंद्रजीत भालेराव यांचे व्याख्यान झाले, यावेळी त्यांनी मी आणि माझी कविता याविषयी आपली भूमिका मांडली. त्या भाषणाचे हे शब्दांकन.

✍शब्दांकन

डॉ. नागेश अंकुश

प्रा. वा. ल. कुलकर्णी व्याख्यानमालेच्या निमित्ताने ''मी आणि माझी कविता'' या विषयावर बोलताना मला फार आनंद होत आहे. कारण ही व्याख्यानमाला केवळ एका व्यक्तीचे स्मरण नाही, तर मराठवाड्यातील साहित्य संस्कृती घडवणाऱ्या एका परंपरेचे स्मरण आहे.

कवी कुठेही जन्माला येऊ शकतो कवी व्हायला एखाद्या मोठ्या शहरात जन्म घ्यावा लागतो असे नाही. कोळ्यांच्या समाजात वाल्मिकी जन्माला येतो, तसेच कोणत्याही कुटुंबात, कोणत्याही गावात कवी जन्मू शकतो. माणसाजवळ संवेदना असली, आजूबाजूच्या जगाकडे पाहण्याची नजर असली, तर तो कवी होऊ शकतो.

माणूस आईच्या पोटी जन्मतो, पण कवी हा भोवतालच्या वातावरणाच्या पोटी जन्मतो. निसर्ग, माणसं, जनावरं, शेती, गाव, सण, दुःखआनंद हे सगळं त्याला घडवतं.

माझं बालपण

मी मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यातल्या रिधोरा या छोट्याशा गावात जन्मलो. त्या गावाची लोकसंख्या फारच कमी होती. गावात पुस्तकं नव्हती, लेखक नव्हते; पण लोकसाहित्याची मोठी परंपरा होती.

जात्यावरच्या ओव्या, पारावर वाचल्या जाणाऱ्या पोथ्या, भारुडं, भिक्षेकरी गायक – हेच आमचे ग्रंथ होते. वासुदेव, खंडोबाचा वारा, भिक्षुक हे फक्त भिकारी नव्हते; ते कलावंत होते. त्यांच्या गाण्यांतून कथा, कविता आणि जीवनदर्शन मिळत होतं.

माझी आई जात्यावर दळताना ओव्या म्हणायची. त्या ओव्या माझ्या मनात साठत गेल्या. कधी एखादी ओवी विसरली, तर मी स्वतः नवीन ओळ जुळवू लागलो. तिथूनच माझ्या कवितेची सुरुवात झाली.

पहिली कविता आणि पहिला सन्मान

लहानपणी मी पहिली कविता लिहिली. ती आईला ऐकवली, तिला आवडली. वडिलांनी मला खांद्यावर बसवून गावातल्या कार्यक्रमात ती कविता म्हणायला सांगितली. लोकांनी टाळ्या दिल्या.

तोच माझा पहिला कवी म्हणून मिळालेला सन्मान होता.

शहरातला संघर्ष

महाविद्यालयासाठी मी शहरात आलो. माझा पेहराव गावाकडचा होता – धोतर, टोपी, उपरणं. शहरातल्या मुलांनी माझी चेष्टा केली. एकाने तर माझी टोपी डोक्यावरून काढली.

तो अपमान माझ्या मनाला लागला. पण त्या वेदनेतूनच माझी कविता जन्माला आली. मी कविता लिहिली–

''बारोमास खळाळणाऱ्या दांडातून आम्ही

उकललो नाहीत केळीच्या गाभ्यासारखे..

आम्ही वाढलो वर्षानुवर्षे अवर्षणग्रस्त भागातील झुडुपासारखे..

परंतु कृपया आम्हाला खुरटे समजु नका

कारण आम्ही तुमच्यापेक्षा जास्त उन्हाळे पाहिलेले आहेत .''

नंतर तीच मुलं माझी मित्र झाली. त्यांनीच मला विद्यार्थी संघटनेचा अध्यक्ष केलं.

मला कळलं – कविता माणसांना जोडते.

गाव, बाप आणि शेती

माझ्या कविता माझ्या गावावर, बापावर, बहिणींवर, शेतीवर आहेत.

शेतकऱ्यांचं दुःख, त्यांचा घाम, त्यांचा संघर्ष मी जवळून पाहिला आहे.

म्हणूनच ''बाप'' ही कविता शाळेच्या पुस्तकात आली आणि ती आजही तिथे आहे. कारण ती खेड्यातल्या मुलांना आपली वाटते.

गुरू आणि आधार

माझ्या आयुष्यात गुरूंचं फार मोठं योगदान आहे.

नागनाथ कोत्तापल्ले सर नसते, तर मी पुढे शिकू शकलो नसतो. घरची परिस्थिती बिकट असताना त्यांनी मला सहा महिने स्वतःच्या पैशाने शिकवलं.

खरा गुरू तोच, जो विद्यार्थ्याला फक्त शिकवत नाही, तर जगायला उभं करतो.

शेवटचा संदेश

माझी कविता माझ्या आयुष्यातून आली आहे. ती पुस्तकातून नाही, तर अनुभवातून जन्मली आहे. म्हणूनच मी विद्यार्थ्यांना सांगतो तुमचं जग पहा, तुमचं दुःख, आनंद समजून घ्या, शब्दांवर प्रेम करा, कवी होण्यासाठी मोठं असणं गरजेचं नाही. खरं असणं गरजेचं आहे.

योजनांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक - डॉ अनुपम टाकळकर

डॉ अनुपम टाकळकर
अध्यक्ष, इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर

छ. संभाजीनगर (ज्योतिर्मय साहित्य) : महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात आरोग्य क्षेत्रासाठी काही सकारात्मक निर्णय दिसतात. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजना अंतर्गत आजारांचे कव्हरेज १७९२ वरून ४५३७ पर्यंत वाढविण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. यामुळे गरीब आणि मध्यमवर्गीय रुग्णांना अधिक आजारांवर उपचार मिळण्याची संधी वाढेल.

कॅन्सर, मधुमेह आणि हृदयविकार यांसारख्या जीवनशैलीजन्य आजारांचे लवकर निदान करण्यासाठी राज्यभर आरोग्य तपासणी मोहिमेसाठी सुमारे ४५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांवर दिलेला भर महत्त्वाचा आहे. शहरी भागातील वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर स्वतंत्र शहरी आरोग्य विभाग उभारण्याची घोषणा देखील महत्त्वाची आहे. डिजिटल आरोग्य तंत्रज्ञान अभियान ही चांगली संकल्पना आहे.

तथापि महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजनांअंतर्गत अनेक रुग्णालयांना उपचारांचे पैसे वेळेवर मिळत नाहीत. काही ठिकाणी देयके महिनोनमहिने प्रलंबित राहतात. योजनांचे कव्हरेज वाढवण्याबरोबरच रुग्णालयांना वेळेवर आणि नियमित देयके मिळतील याकडे सरकारने सकारात्मक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे.

राज्यातील जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर, नर्सेस आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता अजूनही आहे. पायाभूत सुविधा आणि आधुनिक उपकरणांसाठी अधिक गुंतवणूक अपेक्षित आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्था नागपूर येथे स्थापन करण्याचा निर्णय महत्त्वाचा आहे.

मात्र राज्याच्या मध्यवर्ती भागात असलेल्या छत्रपती संभाजीनगरला देखील अशा मोठ्या आरोग्य संस्थांचा लाभ मिळणे गरजेचे आहे.

तसेच मराठवाड्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे एम्ससारखी संस्था उभारण्याची मागणी सरकारने सकारात्मक दृष्टीने विचारात घ्यावी. तसेच नवीन वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्यापेक्षा सध्या अस्तित्वात असलेल्या सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांना बळकटी देणे अधिक गरजेचे आहे. त्याठिकाणी आवश्यक प्राध्यापक आणि कर्मचारी भरती करणे, सुविधा वाढवणे आणि रुग्णालये अधिक आधुनिक करणे यावर सरकारने विशेष लक्ष द्यावे.

एकूण पाहता आरोग्य योजनांचा विस्तार आणि प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांवर दिलेला भर सकारात्मक आहे. मात्र योजनांची प्रभावी अंमलबजावणी, रुग्णालयांना वेळेवर देयके, डॉक्टरांची भरती, विद्यमान वैद्यकीय महाविद्यालयांचे सशक्तीकरण आणि प्रदेशनिहाय आरोग्य सुविधा यावर सरकारने अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.

जात्यावरच्या ओव्या.....

मायबापानं रातभर
नही सोडल गोतात
केल हवाली लोकाच्या
मला हसत रडत ||५३०||

मायबापान संभाळल
जसा तळहाताच फोड
करून लेकीच कन्यादान
झाले कर्णाहून वरचढ ||५३१||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक - भाग ४

ज्योतिर्मय साहित्य

आपल्यासमोर दोन वाटा असतात. त्या म्हणजे श्रेयस आणि प्रेयस. श्रेयस म्हणजे दीर्घकालीन हित आणि मूल्याधिष्ठित निवड असे म्हणता येईल. तर प्रेयस म्हणजे तात्कालिक सुख, आकर्षक वाटणारे पण शेवटी अहितकारक ठरणारी निवड.

तात्पुरत्या लाभासाठी अनैतिक मार्ग स्वीकारणे, सहजसोप्या सुखासाठी मूल्यांचा त्याग करणे ही प्रेयसाची उदाहरणे. पण कठीण असले तरी योग्य मार्ग स्वीकारणे, इतरांच्या आनंदात आनंद मानणे, मदतीचा हात पुढे करणे हे श्रेयसाचे लक्षण.

समर्थ म्हणतात, ''मना धर्मता नीती सोडू नको हो.'' धर्मता म्हणजे धर्माचरण. पण धर्माचरण म्हणजे केवळ धार्मिक आचार नव्हे; तर न्याय, प्रामाणिकपणा, जबाबदारी आणि संवेदनशीलता. नैतिकेने वागण्याची जबाबदारी. परस्त्रीला मातेसमान किंवा बहिणीसमान मानले पाहिजे असं काही कायदा सांगत नाही. परंतु भारतीय संस्कृतीने सांगितलेली नीतीमूल्ये आचरणात आणायची ठरवली तर आपल्याला सुरुवात तिथूनच करावी लागेल. असे झाले तर अनेक अनर्थ टळतील.

नीती म्हणजे आचरणातील सुसंगती. सज्जनांनी घालून दिलेल्या मार्गावर वाटचाल करणे. आजच्या काळात प्रसारमाध्यमे, सामाजिक वातावरण, स्पर्धेची धडपड या सर्वांचा परिणाम मनावर होत असतो. कधी कधी अनैतिक मार्गाने यश मिळताना दिसते. मग मन म्हणते, '' मीच कशाला चांगले वागू ? माझ्यामुळे असा काय फरक पडणार आहे ?'' पण समाजाचा पाया हा प्रत्येकाच्या व्यक्तिगत नीतीवर उभा असतो. आपला छोटा तडजोडीचा निर्णयही मोठ्या अध:पतनाची सुरुवात ठरू शकतो.

या श्लोकात समर्थ पुढे म्हणतात, ''मना अंतरी सार विचार राहो.'' सार म्हणजे जे खरे, टिकाऊ, मूल्याधिष्ठित आहे ते. **(क्रमशः)**





दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

श्रवणनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

स्वस्वरूपाविषयींचा संदेह (मनाची अस्थिरता) हा जन्माचे मूळ असते. उत्तमोत्तम श्रवणाने तो निर्मूळ होतो. मन नि:संदेह बनले की आपपरभाव मनात रहात नाही. सगळं जग स्वच्छ, सुंदर दिसायला लागते. याला समाधान असे म्हणतात.

श्रवणमननाने चित्तवृत्ती शुध्द होते. ज्या परमार्थ स्थानात नित्य नियमांचे श्रवण नाही त्यांची चित्तवृत्ती समाधानी नसते. स्वतः च्या स्वार्थासाठी तरी श्रवणभक्ति केव्हाही उत्तम असते. आपल्याला आपल्यात बदल घडवायचा आहे? तर परमार्थ साधना केली पाहिजे. मनापासून साधना करावी. जे जे उत्तम आहे उदात्त आहे. त्यांचे नेहमीच उदात्तीकरण करावे.

आज सकाळी मी नाष्टा केला आता मला दूपारी भूक नाही असे होत नाही. मी परत दूपारी यथेच्छ जेवते. रात्रीच्या जेवणावर ताव मारते.

हे जसं माझ्या आयुष्यात नित्य दिनक्रम चालू आहे, अन्नपाणी, विश्रांती जशी जगण्याची गरज आहे तसा आत्मकल्याण करून घेण्यासाठी सतत संतसंगतीत रहावे श्रवणानंद लुटावा.

मनापासून साधना करावी.
परमात्मा आपलं स्वतंत्र अस्तित्व सिध्द करेल.
यावर विश्वास ठेवावा.
जय जय रघुवीर समर्थ
श्रीराम जय राम जय जय राम
समास आठवा समाप्त

***



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

नाम कसे घ्यावे ?

ज्योतिर्मय साहित्य

नाम कसे घेऊ हे विचारणे, म्हणजे पेढा कसा खाऊ म्हणून विचारण्यासारखे आहे. पेढा कोणत्याही बाजूने खाल्ला तरी गोडच लागतो, तसे नाम कसेही घेतले तरी ते आपले काम करतेच करते. पेढा ज्याने खाल्ला आहे, तो पेढा कसा खाऊ असे विचारणार नाही, तसे नाम घेणारा मनुष्य नाम कसे घेऊ म्हणून विचारणार नाही. शेतात बी पेरतात तेव्हा त्याचे तोंड वरच्या बाजूला आहे की नाही हे पाहात नाहीत. बी शेतात पडते तेव्हा, ज्या तोंडातून मोड यायचा असतो ते तोंड कोणत्यातरी एका बाजूला, खाली किंवा वरही असू शकेल; पण जेव्हा मोड बाहेर पडतो तेव्हा त्याची दिशा मुळात कोणत्याही बाजूला असली तरी तो वळण घेऊन जमिनीतून वरच येतो. तसे, नाम कसेही घेतले तरी घेणाऱ्याची ते योग्य दिशेने प्रगती करून त्याला योग्य मार्गावर आणून सोडील. म्हणून, कसेही करून नाम घ्यावे.

नाम घेताना कोणती बैठक असावी, किंवा कोणते आसन घालावे ? हा प्रश्न म्हणजे, श्वासोच्छ्वास करताना कोणत्या तऱ्हेची बैठक असावी असे विचारण्यासारखा आहे. समजा, एखाद्याला दमा झाला आहे, तर तो काय करतो ? तो अशा तऱ्हेने बसण्याचा किंवा पडण्याचा प्रयत्न करतो की, जेणेकरून श्वासोच्छ्वास कष्टाशिवाय व्हायला मदत होईल; म्हणजे श्वासोच्छ्वास सुलभ रीतीने कसा चालेल, हे त्याचे ध्येय असते, आणि मग त्याकरिता देहाची बैठक कशीही ठेवावी लागली तरी चालते. श्वासोच्छ्वास विनाकष्ट चालू ठेवणे हे जसे त्याचे ध्येय असते, तसे नाम अखंड कसे चालेल हे आपले ध्येय ठेवावे; आणि त्याला मदत होईल, व्यत्यय येणार नाही, अशा तऱ्हेची कोणतीही बैठक असावी. बैठकीला फार महत्त्व देऊ नये. समजा, आपण पद्मासन घालून नामस्मरणाला बसलो आणि काही वेळाने पाठीला कळ लागली, तर आपले लक्ष नामापेक्षा देहाकडेच लागेल; म्हणजे नाम घेता घेता देहाचा विसर पडण्याऐवजी देहाची स्मृतीच वाढल्यासारखी होईल. म्हणून नामस्मरणात खंड न व्हावा हे ध्येय ठेवून, त्याला अनुकूल अशी ज्याच्या त्याच्या प्रकृतिधर्माप्रमाणे कोणतीही बैठक ठेवावी. भगवंताच्या नामाला शरीराचे कसलेही बंधन नाही. हेच तर नामाचे माहात्म्य आहे. मनुष्याच्या कोणत्याही अवस्थेमध्ये भगवंताचे स्मरण सहज ठेवता येण्याचे एकच साधन आहे, आणि ते म्हणजे त्याचे नाम होय. पण देहबुद्धी अशी और आहे, की त्या निरुपाधिक नामाला आपण काही तरी उपाधी जोडतो, आणि त्या उपाधीवर नाम घेणे अवलंबून ठेवतो; असे न करावे. इतर उपाधी सुखदु:ख उत्पन्न करतील, पण नाम निरुपाधिक आनंद देईल.

शुद्ध भावनेत आणि निष्ठेत खरे समाधान आहे; ही निष्ठा अनुसंधानाने उत्पन्न होते.

श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

दिवस दुसरा

पुढे.....
जगात सर्व उलटे चालले आहे. एखाद्यास वैराग्य आले तर म्हणतात ही कुठून अवदसा आठवली? आणि वाढ दिवशी आयुष्य घटून तसे न समजता तो साजरा करतात. आपले सगळे उलटेच आहे.
उपदेश हा नेहमी मोठ्याने (श्रेष्ठाने) करावा लागतो, तो गुह्य असावा लागतो, तो समोरच्याचे कल्याणा साठी, उद्धारासाठी तळमळीने करावा लागतो.
जगाच्या कल्याणा संताच्या विभूती.
भागवतांनी 2 पद्धतीने उपदेश केला
1 सामान्य 2 विशेषत्वाने
विषयाची आसक्ती सोडून माणसाने कर्तव्य कर्मे करण्यासाठी प्रवृत्त व्हावा हा सर्व साधारण उपदेश आहे.
भागवतात कांहीं विशेष उपदेश आहेत.कपिल मुनींनी आईला केलेला उपदेश. ध्रुव नाराज होऊन अरण्यात निघाले, रस्त्यात नारदांनी दीक्षा रूपांनी त्यास उपदेश केला. तो विशेष आहे.भगवंतांनी राजसूय यज्ञात उष्ट्या पत्रावळी उचलल्या हा क्रिया उपदेश आहे.
कीर्तनातून ज्ञान ,वैराग्य सांगा, सांगा असा दंडक नाथ महा.यांनी सांगितला आहे.
विषय भोगले माणूस दीन होतो. अगतिक होतो. अशी अगतिकता वैराग्य येऊ देत नाही.
भागवतात स्तुती येते. हिचा एकच उद्देश आहे तो म्हणजे परमात्मा.
यात 2 प्रकार आहेत
परमात्मा असा आहे त्याची कितीही स्तुती वाढवून करा तो अर्थवाद होत नाही.ते चूकही ठरत नाही.त्याला चोर म्हणा,कपटी म्हणा अशी लांछने त्याला भूषण ठरतात.
क्रमश :.....

ब्लड सर्क्युलेशन बिघडलं तर पायांत दिसतात ही लक्षणं

ज्योतिर्मय साहित्य

आपले शरीर म्हणजे एकप्रकारे मशीनच असतं. ज्याचे वेगवेगळे पार्टस म्हणजेच अवयव आपापली कामे करत असतात. यात एक सगळ्यात महत्वाची प्रक्रिया असते ती म्हणजे ब्लड सर्क्युलेशन म्हणजे रक्तप्रवाह. ब्लड सर्क्युलेशन जर सुरळीत असेल तर शरीर व्यवस्थित काम करतं. पण यात जर काही अडथळा आला तर शरीरात वेगवेगळ्या समस्या होतात. याची काही लक्षणं सगळ्यात आधी पायांवर दिसू लागतात.

धमन्यामध्ये ब्लॉकेज होणे, डायबिटीस, नसांमध्ये ताण किंवा नुकसान यांसारख्या कारणांमुळे ब्लड सर्क्युलेशन प्रभावित होतं. याकडे जर वेळेत लक्ष दिलं नाही तर समस्या गंभीर होऊ शकते. अशात पाहुयात की, ब्लड सर्क्युलेशनमध्ये काही गडबड असेल तर काय लक्षणे दिसतात.

टाचा आणि पायांमध्ये सूज येणे...

जेव्हा ब्लड सर्क्युलेशन नीट होत नाही, तेव्हा फ्लुइड टाच आणि पायांच्या टिश्यूजमध्ये साचतं, याला एडीमा म्हणतात. ही सूज जास्त वेळ बसून राहिल्यावर किंवा उभं राहिल्यावर अधिक वाढते. त्वचेवर बोटाने दाबल्यावर खड्डा पडल्यासारखं वाटणं हे त्याचं सामान्य लक्षण आहे. अशा प्रकारची सूज हृदयाची कमजोरी, किडनीच्या समस्या किंवा नसा कमजोरीचे संकेत असू शकतात.

पाय नेहमीच थंड राहणे...

जर तुमचे पाय नेहमी थंड असतील किंवा इतरांना स्पर्श केल्यावर थंड वाटत असतील, तर हा ब्लड सर्कुलेशन कमी झाल्याचा संकेत असू शकतो. जेव्हा पायांपर्यंत गरम रक्त नीट पोहोचत नाही, तेव्हा पाय थंड राहतात. ही समस्या थायरॉइड किंवा पेरिफेरल आर्टरी डिसीज () मध्ये सामान्यपणे आढळते.

स्नायूंमध्ये वेदना...

ब्लड सर्क्युलेशन जर सुरळीत होत नसेल तर मांडी, पोटऱ्या किंवा तळपायात अचानक क्रॅम्प येतात किंवा वेदना होतात. हे क्रॅम्प सामान्यपणे रात्री झोपेत किंवा व्यायाम करताना येतात. जेव्हा स्नायूंना पुरेशा प्रमाणात ऑक्सिजन मिळत नाही, तेव्हा ते आकुंचन पावतात आणि त्यामुळे वेदनादायक क्रॅम्प येतो.

काय कराल बचाव...?

-नियमित व्यायाम करा...

नियमित व्यायाम हा ब्लड सर्क्युलेशन सुधारण्यासाठी काही सोपे उपाय आहेत. त्यात वेगानं चालणे, स्विमिंग, सायकल चालवणे किंवा जॉगिंग यांसारख्या एरोबिक व्यायामांचा समावेश आहे. या व्यायामांनी हृदयाचे ठोके वाढतात आणि शरीरभर रक्तप्रवाह सुरळीत होतो.

- पौष्टिक आहार घ्या...

आहारात मिठाचे प्रमाण कमी ठेवा, कारण मिठामुळे शरीरात सूज वाढते. पॅकेज्ड, प्रोसेस्ड आणि जंक फूड टाळा. त्याऐवजी ताजी फळं, हिरव्या पालेभाज्या, धान्ये आणि अँटी-ऑक्सिडंट्स असलेल्या पदार्थांचा आहारात समावेश करा.

- स्नायूंसाठी व्यायाम...

पोटऱ्यांच्या स्नायूंना शरीराचं दुसरं हृदय म्हटलं जातं, कारण हे स्नायू पायांमधील रक्त परत वर हृदयाकडे ढकलण्यास मदत करतात. म्हणून टो-राइज सारखे व्यायाम करा, जे पोटऱ्यांना मजबूत ठेवतात.

आहारातील बदल...

१. लसूण () : रोज सकाळी १-२ लसूण पाकळ्या खा. लसूण रक्तातील कोलेस्ट्रॉल कमी करून रक्तवाहिन्या मोकळ्या ठेवतो.

२. आले () : चहामध्ये आले घालून घ्या किंवा आले लिंबू-हनी ड्रिंक घ्या. हे रक्ताभिसरण सुधारते.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

आनंदामृत ....

विचारमंथन प्राचीन वाङ्मयाचे...

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे
मो. 95030 45495

प्रस्तावना विषयाची..

पुढे.....
"विक्रमादित्य = आत्मा" "वेताळ = मन"
ही कथा केवळ गोष्ट नाही; ती अंतर्मनातील संवाद आहे. वेताळ म्हणजे काय?
वेताळ नेहमी झाडावर उलटा लटकलेला असतो.
तो शांत बसत नाही. प्रश्न विचारतो.
राजा गप्प बसला तर ठीक, पण बोलला की वेताळ परत झाडावर! हेच मन आहे. सतत विचार, सतत विश्लेषण, सतत शंका, सतत आठवणी. मन कधी स्थिर बसत नाही. आपण शांत झालो की ते पुन्हा एखादा प्रश्न टाकते.
- विक्रमादित्य म्हणजे काय?
राजा प्रत्येक वेळी वेताळाला पुन्हा खांद्यावर घेतो.
तो पळून जात नाही. तो घाबरत नाही. तो कंटाळत नाही. हेच आत्मस्वरूप आहे. साक्षी, धैर्यवान, न ढळणारा, शांत
- थोडक्यात
वेताळ म्हणजे चंचल मन, विक्रम म्हणजे धैर्य
आदित्य म्हणजे प्रकाश. म्हणजेच - विक्रमादित्य = धैर्यपूर्ण जागरूक प्रकाश
- गूढ बिंदू : वेताळ प्रश्न विचारतो कारण तो आपल्याला जागृत ठेवतो. मन शत्रू नाही. तो शिक्षक आहे. परंतु जर आपण त्याच्याशी एकरूप झालो - तर तो आपल्याला झाडावर (अस्थिरतेत) नेतो. जर आपण साक्षी झालो - तर तो आपल्या खांद्यावर शांत बसतो. हीच ती अवस्था आहे, विचार आहेत, पण आपण विचार नाही. भावना आहेत, पण आपण भावना नाही. प्रश्न आहेत, पण आपण प्रश्नकर्ता नाही. आपण तो शांत साक्षी आहोत, जो प्रत्येक वेताळाला हसत पुन्हा खांद्यावर घेतो
- वेताळ पंचविंशती - मानसशास्त्रीय अर्थ
ही २५ कथा म्हणजे केवळ मनोरंजक कोडी नाहीत.
त्या मानवी मनाच्या २५ गुंतागुंतीच्या अवस्थांचे प्रतीक आहेत.
राजा विक्रम = सजग आत्मजाणीव वेताळ = प्रश्न विचारणारे मन
प्रत्येक कथा संपते एका नैतिक द्वंद्वावर - हेच आपल्या जीवनातील निर्णयांचे मानसशास्त्र आहे.
२५ कथांचे अंतर्मनातील प्रतीकात्मक अर्थ
मी येथे प्रत्येक कथेचा शब्दशः तपशील न देता
मानसिक अवस्थांप्रमाणे २५ स्तर सांगते: क्रमश :.....

चुडाराम बल्हारपुरे उत्कृष्ट नाट्यलेखन पुरस्काराने सन्मानित

जत्रा घडली नागोबाची या महानाट्यास पुरस्कार प्रदान

ज्योतिर्मय साहित्य

गडचिरोली - बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे दि.२१ फेब्रुवारीला झाडीपट्टीतील प्रसिद्ध नाटककार व महसूल विभाग,जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथील से.नि. कर्मचारी /साहित्यिक चुडाराम बल्हारपुरे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

पुणे महानगरपालिका, मराठी भाषा संवर्धन समिती,संवाद पुणे व यशदा पुणे यांचे वतीने दरवर्षी शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे करीता राज्य स्तरीय उत्कृष्ट वांड्.मय स्पर्धा आयोजित करण्यात येते. व पुरस्कार प्राप्त साहित्यिकांना संस्थेच्या वार्षिक साहित्य संमेलनात उत्कृष्ट साहित्यिक पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.

राज्य स्तरावर अत्यंत दर्जेदार व मानाचा समजला जाणाऱ्या या पुरस्कारासाठी यावर्षी अनेक शासकीय अधिकारी व कर्मचारी साहित्यिकांनी सहभाग नोंदविला होता. त्यात तांत्रिक विषयावरील विषयविशिष्ट साहित्य संवर्गातील मराठी नाट्यवाड्.मय साहित्य प्रकारात नाटककार चुडाराम बल्हारपुरे यांच्या मधुश्री पुणे प्रकाशित व नाट्यश्री निर्मीत जत्रा घडली नागोबाची या महानाट्यास यंदाचा नाट्यलेखनाचा उत्कृष्ट साहित्यकृती पुरस्कार- २०२६ प्रदान करण्यात आला.

पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिरात झालेल्या भव्यदिव्य दुसरे राज्यस्तरीय शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन - २०२६ तसेच पुरस्कार वितरण सोहळ्यात कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.महेश भागवत (भा.प्र.से.अतिरिक्त पोलिस महासंचालक, कायदा व सुव्यवस्था, तेलंगणा), पुर्वाध्यक्ष मा.शेखर गायकवाड (भा.प्र.से.अतिरिक्त महासंचालक, यशदा पुणे), यांचे हस्ते व मा. राजीव नांदकर (अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा सहयोगी प्राध्यापक - यशदा पुणे), डॉ. किरण धांडे (भा.प्र.से. तथा प्र.अ. प्रकाशन, यशदा पुणे), वैशाली पतंगे (भा.प्र.से.यशदा पुणे), व्यंकटेश कल्याणकर (भा.प्र. से. तथा प्रकल्प संशोधक,यशदा पुणे), सार्थक थोरवत (भा. प्र.से. माध्यम व प्रकाशन केंद्र, यशदा पुणे) तसेच अनेक भा.प्र.से. व महाराष्ट्र शासन सेवेतील अनेक उच्च पदस्थ अधिकारी इ. व मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप आकर्षक सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, व ग्रंथभेट असे आहे.

चुडाराम बल्हारपुरे यांच्या या यशामुळे महसूल विभागाची तसेच गडचिरोली जिल्ह्याची व झाडीपट्टीची मान उंचावली असल्याची प्रतिक्रिया पद्मश्री डॉ. परशुराम खुणे, सुनील चडगुलवार (से.नि. नायब तहसीलदार) महसूल विभाग, झाडीपट्टी कलावंत संघटना, गडचिरोली व झाडीपट्टी लेखक संघटना गडचिरोली जिल्हा यानी व्यक्त केली असून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

प्रा. अरुण बुरे, योगेश गोहणे, रमेश निखारे, प्रा.डॉ.श्याम मोहरकर, प्रा.डॉ. जनबंधू मेश्राम, प्रा.डॉ. योगीराज नगराळे, नाट्यश्रीचे दादा चुधरी, दिलीप मेश्राम, राजेंद्र जरुरकर, डॉ. दिपक चौधरी, प्रा. नवनीत देशमुख (साहित्यिक), मधुश्री प्रकाशनचे पराग लोणकर (प्रकाशक), महसूल विभागातील अधिकारी/ कर्मचारी, इतर साहित्यिक व कलावंतांनी अभिनंदन केले आहे.

''शिवभक्त मोफत भोजन सेवा'' वाघ प्रतिष्ठान मार्फत स्तुत्य उपक्रम

ज्योतिर्मय साहित्य

जांभळी (ता. भोर, जि. पुणे) येथे गुंजवणे खोऱ्यातला वाघ प्रतिष्ठान मार्फत छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवजन्मोत्सवानिमित्त ''शिवभक्त मोफत भोजन सेवा'' हा स्तुत्य सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. जांभळी येथील हॉटेल जगदंब येथे हा उपक्रम १८ व १९ फेब्रुवारी तसेच तिथीनुसार ५ व ६ मार्च रोजी दिवस-रात्र अखंड सुरू ठेवण्यात आला होता.

शिवजयंती निमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक शिवभक्त राजगड व तोरणा गडावरून शिवज्योत घेऊन जाण्यासाठी या मार्गाने जात असतात. या शिवभक्तांना प्रवासादरम्यान अन्नाची सोय व्हावी व त्यांना थोडा विसावा मिळावा या उद्देशाने प्रतिष्ठानने ही मोफत भोजन सेवा सुरू केली. या ठिकाणी शिवभक्तांसाठी गरम व ताजे अन्न, पिण्याच्या पाण्याची सोय तसेच बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

प्रतिष्ठानचे कार्यकर्ते ''मोफत भोजन सेवा'' असा फलक हातात घेऊन येणाऱ्या-जाणाऱ्या शिवभक्तांना व प्रवाशांना या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन करताना दिसून येत होते. त्यामुळे अनेक शिवभक्त तसेच सामान्य प्रवाशांनी या उपक्रमाचा लाभ घेतला आणि प्रतिष्ठानच्या या सेवाभावी कार्याचे कौतुक केले.

या उपक्रमामुळे भोर-राजगड परिसरात तसेच पंचक्रोशीत या उपक्रमाची मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू झाली असून सामाजिक कार्याचा आदर्श निर्माण झाल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली आहे.

यंदा या उपक्रमाचे पहिलेच वर्ष असल्याने काही त्रुटी राहिल्या असतील, त्या पुढील वर्षी नक्कीच सुधारून शिवभक्तांना आणखी उत्तम व मोठ्या प्रमाणात सेवा देण्याचा प्रयत्न करू, अशी माहिती प्रतिष्ठानच्या वतीने श्री. अविनाश गुरव यांनी दिली.

जैन कासार प्रतिष्ठानची विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

चिंतामणी पार्श्वनाथ फंडातून उच्च शिक्षणासाठी ५१ हजार रुपयांचे वाटप



ज्योतिर्मय साहित्य

सोलापूर : समाजातील अनेक आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि हुशार विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणाचे स्वप्न फक्त पैशाअभावी अपुरे राहू नये त्यांनी त्यांच्या बुद्धिमत्तेच्या जोरावर आपले आणि देशाचे भविष्य उज्वल करावे. याच विचारातून जैन कासार विकास प्रतिष्ठानच्या वतीने समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते, असे अध्यक्ष हुकूमचंद हेसे यांनी सांगितले.

जैन कासार प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या चिंतामणी पार्श्वनाथ शिष्यवृत्तीचे या वर्षीचे वाटप अध्यक्ष हुकूमचंद हेसे, संस्थापक अध्यक्ष डॉ.विलास हरपाळे, अध्याय शिष्यवृत्ती फंडाचे संयोजक महावीर दुरुगकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना करण्यात आले. यावर्षी उच्च शिक्षण घेत असलेल्या गरजू व होतकरू अशा नऊ विद्यार्थ्यांना ५१ हजार रुपयांच्या धनादेशाद्वारे वाटप करण्यात आले.

मागील चार वर्षांपासून उपक्रम चालू असून आतापर्यंत अडीच लाख रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आल्याची माहिती संयोजक महावीर दुरुगकर यांनी दिली. दि. जैन कासार संस्थेचे अध्यक्ष विजयअण्णा कासार, डॉ. विलास हरपाळे, भारतभूषण मैंदर्गे, प्राचार्य अशोक साळवी, डॉ.मधुकर लोखंडे, यांनी दिलेल्या देणगीतून ही शिष्यवृत्ती देण्यात येते. समाजातील होतकरू विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी प्रतिष्ठानचा प्रयत्न आहे. वाढता शिक्षणाचा खर्च पाहता भरीव आर्थिक मदत करण्याची गरज आहे. यासाठी प्रतिष्ठानने चिंतामणी पार्श्वनाथ फंडाची सुरुवात केली असून पंचवीस लाख रुपये जमा करण्याचा संकल्प असल्याचे हुकूमचंद हेसे (अध्यक्ष चिंतामणी पार्श्वनाथ शैक्षणिक फंड) यांनी सांगितले.

सोलापूर, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातील पद्मराज कासार, ओंकार पाटील, संदेश काटकर, पूनम इंजे, अन्यना कंदले, रोहन कंदले, संकेत बोळ, अरिहंत पाटील आदी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

मूल मराठी लेखिका - उज्ज्वला केळकर
हिन्दी अनुवादिका - डॉ. मीना श्रीवास्तव

स्मृति का उत्तरीय

आगे.....

अब तो वह सोलह साल की हो चुकी थी और कॉलेज में जाने लगी थी और अच्छी खासी स्मार्ट हो गई थी। उसमें स्कूली लड़कियों वाली नासमझी और भोलेपन का नामोनिशान तक नहीं बचा था।

सोलह साल की वह लड़की गुलाबी साड़ी के साथ लाल ब्लाउज़ पहनकर आगे आई। उस समय, हल्के रंग की साड़ी के साथ गहरा ब्लाउज़ और गहरे रंग की साड़ी के साथ हल्का ब्लाउज़, यही मैचिंग करने की एकमात्र धारणा थी। उसने कॉलेज के उन तितली जैसे रंगबिरंगे दिनों का एक तितली की तरह ही आनंद लिया।

"मैंने कॉलेज की जिंदादिल जिंदगी का जी भरकर मजा उठाया। मैं टेबल टेनिस खेलना सीख गई। मैं इनडोर गेम्स की सचिव बन गई और साहित्य मंडल की उपाध्यक्ष भी| मैंने नाटकों में काम किया एवं कविताएँ भी लिखीं। कभी-कभी मैं अपने कॉलेज के पीरियड छोड़कर मैटिनी शो देखने भी चली जाती। मैं हर जगह झूमती, नाचती और गाती रहती। इस कारण मेरी कई सहेलियां बन गईं| बस एक चीज रह गई। प्यार करना रह ही गया, यानि जिससे प्रेम करना चाहूँ, ऐसा कोई व्यक्ति मिला नहीं| फिल्मों, नाटकों, कहानियों और उपन्यासों में ऐसे युवा पुरुष युवतियों से यकायक किस तरह मिलते हैं यह मेरे तो पहेली ही रही। मेरी शादी आखिरकार 'चाय और पोहे' की सामान्य रस्म के साथ तय हुई।

विवाह संपन्न हुआ। चार घरों की बहुओं की आम जिंदगी जैसी मेरी भी जिंदगी गुजरने लगी| नयी नवेली गृहस्थी में मुझे यह बहुत खास लगती थी| कभी पीड़ा और दुःख दर्द भी झेले| लेकिन मुझे ऐसा कभी भी महसूस नहीं हुआ कि एक ही धागा सुख का हो और सौ धागे दुःख के हों| दुःख के धागों के साथ-साथ खुशियों के मुलायम, रंग-बिरंगे, रेशमी धागे भी हाथ में आते रहे। क्रमशः.....

विलक्षण प्रतिभेचे देणं लाभलेले एक व्यक्तिमत्व गोविंद पुराणिक

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या ओळख साहित्यिकांची या सदरात आज ओळख करून घेणार आहोत श्री गोविंद नागाचार्य पुराणिक यांची. श्री गोविंद पुराणिक यांचा जन्म ०१.०८.१९६३ रोजी झाला.घरात अध्यात्मिक व शैक्षणिक वातावरण असल्यामुळे गोविंद यांच्यावर तसेच सुंदर संस्कार घडत गेले आणि आपल्याला एक श्रेष्ठ साहित्यिक, निवेदक, मिळाला.

श्री गोविंद पुराणिक यांनी बीएससी इलेक्ट्रॉनिक्स केल्यानंतर पुढे इंग्रजी मध्ये एमए केले. तसेच डिप्लोमा इन टॅक्सेशन लॉ, पीजी डिप्लोमा इन.ह्युमन राइट्स अँड ड्युटीस, डिप्लोमा इन इंटिग्रेटेड जर्नालिझम,हिंदी प्राज्ञ, एमबीए (एच आर) अश्या विविध पदवी, पदविका त्यांनी प्राप्त केल्या आहेत.

बीएसएनला श्री गोविंद पुराणिक यांनी परभणी नांदेड आदी ठिकाणी लेखाधिकारी म्हणून उत्कृष्ट काम केले आहे. आणि जानेवारी २०२० मधून त्यांनी गोल्डन सेक हॅण्ड मध्ये ऐश्चिक सेवानिवृत्ती स्वीकारली व नांदेड येथे ते स्थायिक झाले आहेत. नौकरी मध्ये असताना त्यांनी भारतीय मजदुर संघ, राष्ट्रीय स्व. सभेत विविध पदांची जबाबदारी स्वीकारून आपले योगदान दिले आहे. आता सेवानिवृत्ती घेतल्यानंतर त्यांनी स्वतःला साहित्य व कलेसाठी वाहून दिले आहे. त्यांचे मराठी व इंग्रजी भाषेवरचे प्रभुत्व असामान्य.आहे. ते एक उत्कृष्ट लेखक, कवी, व्याख्याते, निवेदक म्हणून प्रसिद्ध आहेत.

आजवर त्यांनी विविध मासिके व स्मरणिकांचे संपादन केले आहे. त्यांचा स्वतःचा गीतगोविंद हा भक्तिगीत संग्रह प्रकाशित व प्रसिद्ध आहे.तसेच आमोद या प्रातिनिधिक काव्य संग्रहात ही त्यांच्या उत्कृष्ट कवितांचा समावेश आहे. शब्द माझे, चला शिकूया इंग्रजी व्याकरण त्यांची ही पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. आजवर त्यांनी नांदेड, परभणी, संभाजी नगर,

नाशिक, पुणे, मुंबई आदी ठिकाणी १४१ सांगीतिक मैफिलीत निवेदन केले आहे. प्रकाशन सोहळा, पुरस्कार वितरण सोहळा, स्नेह संमेलने व्याख्यानमाला आदी ठिकाणी ३६० च्या वर सूत्र संचालन केलेले आहे. सामाजिक व शैक्षणिक विषयावर त्यांची व्याख्याने विशेष गाजतात. नांदेडच्या प्रसिद्ध अश्या काही मैफिलीत, उदा. संगीत शंकर दरबार, दिवाळी पहाट आणि पाडवा पहाट निवेदन केले आहे, करत असतात.२०१६ पासून नृसिंह चरित्र, श्रीमद भागवत महात्म्य, दत्तावतारी संत, गुरुमहिमा.आणि राम चरित्रावर आजवर त्यांनी ३७ प्रवचने दिली आहेत. श्री गोविंद सर प्रवचन देत असताना श्रोते मंत्रमुग्ध न झाले तरच नवल. या शिवाय कोविड काळात नांदेर जिल्हा प्रशासनाने केलेल्या कार्याचे अधिकृत अहवाल लेखन २०२२ साली त्यांनी केले आहे. बोलताना अतिशय स्पष्ट उच्चार,वाणीत गोडवा ही त्यांची खासियत आहे.

आजवर त्यांना मिळालेले.पुरस्कार –

१) राष्टीय एकात्मता योगदान पुरस्कार २) गुणीजन गौरव पुरस्कार ३) कै. गंगुताई साले सामाजिक सेवा पुरस्कार ४) संचार सारथी पुरस्कार (बी एस एन एल) त्यांच्या कविता एक से एक सुंदर आणि अर्थपूर्ण असतात. त्यांची स्वतःला आवडणारी स्वत:ची एक कविता पुढील प्रमाणे आहे.

हीच खरी दीपावली
स्वार्थाच्या कभिन्न सावटांनी
वेढलेला भवताल....
आपुलकीचा दीपच भेदू
शकतो.. संकुचितपणानं भारलेल्या
तिमिररेषा...
पुरेसा आहे.. निर्व्याज प्रेमाचा
एकच कवडसा..
काडीचा आधार बुडत्याला...
तसा
काजवाच लाजवी अंधाराला...
पण... निर्मळ प्रेमाच्या
काजव्याचं दुर्भिक्षच सर्वदूर...
बंधुत्व आणि सहवेदना..
डोकावतात फक्त पुस्तकात आणि
भाषणात...
वास्तव तर गुंडाळून ठेवलंय
बासनात....
नकोत फुकाचे उपदेश,
तर्कवितर्क आणि निरस
शब्दछल..
हवी आहे ज्योतीने ज्योत
प्रज्ज्वलित करणारी आणि
अंतरातील भाव ओळखून,
वेदनांच्या काळोखांना...
निकोप प्रेमदीपाने, उजळून
टाकणारी दीपावली.

अशी ही मनाला प्रसन्न करणारी, वातावरण तेजोमय करणारी अतिशय सुंदर कविता होय.

श्री गोविंद पुराणिक सरांना त्यांच्या भविष्यातील कार्यासाठी व साहित्य प्रवासासाठी खूप खूप शुभेच्छा

**

गोळाबेरीज

ज्योतिर्मय साहित्य

सुप्रसिद्ध गीतकार मजरूह सुलतानपुरी यांचा एक मस्त शेर आहे. मै अकेलाही चला था जानिब – ए – मंजिल मगर लोग साथ आते गए और कारवाँ बनता गया. आज हा शेर आठवायचं कारण म्हणजे मी असाच विचार करत बसलो होतो की, आपल्याला आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर कशी आणि किती माणसं भेटत गेली. अगदी शाळा कॉलेजच्या दिवसांपासून ते पुढे नोकरी, लग्न, संसारापर्यंत विविध प्रकारची माणसं भेटली. त्यातील काही खास मित्र बनले, काही नात्यातील, काही परिचीत, काही नुसतेच हाय हॅलो करणारे लोकं भेटत गेले, मी जमवत गेलो. छंदच होता म्हणाना एक प्रकारचा. कारण तोडण्यापेक्षा जोडणे मला जास्त योग्य वाटले.

लोकांना काहीतरी छंद असतात तसा मला माणसं जोडण्याचा छंद होता. माणसं जोडली म्हणजे बेरीजच असायची कायम, तशा नाइलाजाने वजाबाक्याही केल्या पण अगदीच नगण्य. विविध प्रकारची, वेगवेगळ्या वयोगटातील माणसं जोडत राहिलो. इथे ना जातीपातीचा अडसर होता ना धर्माचा.

गरीबी श्रीमंतीचा कधी अडसर नाही आला. खरंतर माणसं जोडली म्हणजे काय ? आणि मी काही मुद्दामून जाणिवपूर्वक प्रयत्न नाही केले, ते भेटत गेले मी जमवत गेलो, बस्स अगदी सहज घडत गेलेली गोष्ट. इथे फायदा तोट्याची व्यावहारिक गणितं नव्हती, होती ती फक्त विचारांची देवाणघेवाण.


शेखर देशपांडे
छत्रपती संभाजीनगर

जेवढं चांगलं कोणाकडून घेण्यासारखे होते ते घेतले, परतफेड विचारांचीच करायची होती म्हणून बरे झालं. देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे ह्या ओळींनी लहानपणापासून मनात घर केलेले होते. आणखी एक पथ्य पाळले ते म्हणजे कर्मण्ये वाधिकारस्ये मा फलेशू कदाचन प्रमाणे कोणाकडून कशाचिही अपेक्षा नाही ठेवली. म्हणजे आपण कोणाशी मैत्री करतो तर ती निर्व्याज मनाने करतो, मनं जुळतात मैत्री होते. स्वार्थासाठी जी जवळिक केली जाते ती मैत्री नसते.

माणसं जोडण्याचा छंद असल्यामुळे वेगवेगळ्या तऱ्हेची, स्वभावाची, माणसं आपल्या संपर्कात आली. परंतु कोणाला किती जवळ करायचं आणि कोणाला किती अंतरावर ठेवायचे हे आपल्यावर अवलंबून असते. थोडीफार गफलत झाली देखिल, पण त्याचा ना खेद ना खंत. सगळेच अनुभव चांगले होते असं नाही म्हणता येणार, काहिंनी त्यांचे रंग दाखवलेच. काहिंनी त्यांच्या फायद्यासाठी घेतला माझा वापर करून, काहिंनी केसाने गळा कापला. पण जाऊ दे ज्याचं त्याच्यापाशी, सोडून द्यायचं शेवटी कायकाय धरून ठेवायचं. निगेटिव्ह गोष्टी वजा करून टाकायच्या पॉझिटिव्ह गोष्टींचा संचय करायचा. आयुष्यातिल गणितं सोडवताना गुणाकार, भागाकार, लसावि, मसावि, वर्गमूळ इत्यादिपैकी काहिच कामाला येत नाही. कामाला येते ती वजाबाकी करून शिल्लक राहिलेली बेरीज. म्हणून इतर गणितं नाही आली सोडवता तरी निराश नाही व्हायचं, ही माणसांची बेरीज वजाबाकी मात्र चांगली यायला हवी. आयुष्यात सगळी गोळाबेरीज करून झाल्यावर माणुस विचार काय करतो तर शिल्लक काय राहिले? आणि जेव्हा त्याला लक्षात येतं की आपण जी माणसं जमवली तिच आपली आयुष्याची कमाई आहे, हिच आपली शिल्लक आहे. हे समाधान माणसाला जगण्याचं बळ देतं, तो आनंद काही वेगळाच असतो.

क्षण झाला अमर...

ज्योतिर्मय साहित्य

मना ''सज्जना'' भक्तिपंथेचि जावे..

मनाच्या श्लोकांची ही सुरवातच जबाबदारी ने चिंतन करण्याची आहे.

समर्थ मनाला ''सज्जन'' म्हणतात यातून दोन अर्थ निघू शकतात १. मन सज्जन आहे (च) २. नसेल तर त्याने सज्जन व्हावे (च)

समर्थांना जे शिकवायचे आहे त्याचा पाया ''सज्जन मन'' आहे. मन, व बुद्धी ज्यावर काम करतं ते स्वकल्याणाचं असेलच असं नाही. देह पंचमहाभूतांचा बनलेला असल्याने मर्यादित आहे. अमर्यादाचा अनुभव हा मर्यादित असलेल्या बुध्दी ला पटत नाही. दृश्य जगतातील सिध्दता व परिणामच तिला मान्य आहेत. म्हणून स्व ची शत्रूच ती ठरते. मनाने शांत होणे आवश्यक असते. असे शांत मन सज्जन मन आहे जे सज्जनाप्रमाणे जीवाचे कल्याण इच्छिते.


अपर्णा परांजपे,
पुणे मो. 95030 45495

असे शांत मन जेव्हा भक्ति करू लागते, साक्षीभावाने सगळं अनुभवत असताना स्थिर राहू शकतं त्यावेळीच फक्त प्रशांत , अनंत , अमर्याद, अथांग, असीम आनंदाचा अनुभव येऊ शकतो. मनाला माहित नसलेला पण हृदयातून उत्पन्न झालेला हा आनंद बुध्दीने मान्य करणे म्हणजे मिळालेला ''क्षण'' उपभोगणे

''आत्माराम राजाराम निर्गुणराम'' भगवंत हृदयस्थ आहे

''सामाजिक कृतज्ञता निधी समर्पण'' कार्यक्रम दहा मार्च रोजी

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – भारतीय मजदूर संघाशी संलग्न असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड एम्प्लॉइज वेल्फेअर ऑर्गनायझेशन तर्फे यंदाचा ''सामाजिक कृतज्ञता निधी'' समर्पण समारंभ येत्या मंगळवारी दहा मार्च रोजी नवीपेठ येतील निवारा सभागृहामध्ये सकाळी दहा वाजता संपन्न होणार आहे.

कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्त्या भारती ठाकूर (मध्यप्रदेश) ह्या प्रमुख पाहुण्या असणार आहेत. बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी निधू सक्सेना, बँक ऑफ महाराष्ट्र ऑफिसर्स ऑर्गनायझेशनचे संस्थापक बाळासाहेब फडणवीस ह्यांची मुख्य उपस्थिती राहणार आहे.

ह्या संघटनेतर्फे दर वर्षी विविध सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक, क्रीडा, पर्यावरण, गोसेवा तसेच विविध

सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक संस्थांना सामाजिक बांधिलकीचा दृष्टिकोन समोर ठेवून सामाजिक कृतज्ञता निधीचे समर्पण करण्यात येत असते.आत्तापर्यंत अनेक सामाजिक संस्थांना गेल्या वीस वर्षांमध्ये दोन कोटी रुपयाच्या वर आर्थिक मदत संस्थेतर्फे करण्यात आलेली आहे. सामाजिक कृतज्ञता निधी समर्पणाचे निवृत्त बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी संघाचे हे यंदाचे एकविसावे वर्ष आहे.

कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष मोहन घोळवे, कार्यकारी अध्यक्ष भास्कर माणकेश्वर, महासचिव नारायण अचलेरकर यांनी केले आहे.

साक्षातमध्ये कवी अजय कांडर, मराठवाडा साहित्य परिषदेच्या उपक्रमात आज सायंकाळी रसिकांशी साधणार संवाद

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर– मराठवाडा साहित्य परिषदेच्या साक्षात उपक्रमामध्ये शनिवार, ७ मार्च रोजी कणकवलीचे कवी अजय कांडर यांना आमंत्रित केले आहे, अशी माहिती मसापचे अध्यक्ष कौतिकराव ठाले–पाटील यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या डॉ. ना. गो. नांदापूरकर सभागृहात सायंकाळी साडेपाच वाजता अजय कांडर यांचे भाषण होईल. ते आपल्या लेखनप्रवासाविषयी, वाङ्मयी भूमिकेबद्दल व समकाली लेखक–कवींच्या लेखनासंबंधी विचार मांडतील.

कांडर यांच्या भाषणानंतर रसिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना ते उत्तरे देतील. कार्यक्रमाच्या अखेर ते काही कविता सादर करतील. अजय कांडर यांचे आवानओल, हत्ती इलो, युगानयुगे तूच हे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. शेतीनिष्ठ लोकसमूहासमोरचे प्रश्न, कष्टकरी स्त्रियांचे जीवन, ग्रामीण समाजावर वाढलेला राजकारणाचा प्रभाव, सामाजिक प्रश्न मोठ्या आस्थेने त्यांनी आपल्या कवितेतून मांडले. त्यांचा महाराष्ट्र फाउंडेशनचा काव्यपुरस्कार, विशाखा काव्यपुरस्कारासह अनेक मान सन्मान मिळालेत. साक्षात उपक्रमाला रसिकांनी उपस्थिती लावावी, असे आवाहन मसापचे कार्यवाह दादा गोरे, उपाध्यक्ष आसाराम लोमटे, रामचंद्र तिरुके, कोषाध्यक्ष रामचंद्र काळुंखे, सहकार्यवाह गणेश मोहिते, दीपा क्षीरसागर, कार्यक्रम समितीचे अध्यक्ष हंसराज जाधव यांनी केले आहे.

फिरुन येती स्मृती...

ज्योतिर्मय साहित्य

आज शाळेची आठवण झाली, तशी ती रोजच येत असते. सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत नेहमी सहभाग, प्रथम क्रमांकाचे बक्षीस हे ठरलेले असायचेच, प्रत्येक ठिकाणी अर्ज लिहिण्यासाठी माझी आत्या मला नेहमी अर्ज, पत्र लिहायला लावायची, बालपणापासून सुंदर हस्ताक्षर, लेखन, निबंधलेखन, पत्र लेखन हा सराव असायचाच, आजोबा शिक्षक, त्यामुळे दैनंदिनी, परवा वगैरे साऱ्या गोष्टींचा नित्यनियमाने असायचा.

प्रत्येक नोकरीच्या वेळी सुंदर हस्ताक्षराचा फार उपयोग झाला. पण पुढे गंमत अशी की, आधी नोकरीच्या ठिकाणी नोकरी मिळाली म्हणून इंटरव्ह्यू मध्ये आपल्याला काय काय येते, आणि आपले काम आपण कसे उत्तम रीतीने करु शकतो हे पटले तरच चांगली नोकरी मिळणार, आणि पैसे भरुन , शिफारशीने नोकरी न मिळविता स्वतः च्या अंगमेहनत, कलागुणांवरच नोकरी मिळावी अशी अपेक्षा होती.

तशाच नोकर्या मिळत ही गेल्या पण शाळेत कायमस्वरूपी व सर्व दृष्टीने सोयीस्कर अशी नोकरी मिळाल्यानंतर तिथेच स्थायिक झाले. तर सांगायचे म्हणजे काय, सुंदर अक्षर पाहून बरेचसे माझे नव्हते ते ही काम पाठी लागले, काही लोक या ना त्या कारणाने काहीतरी लिहून घेत असत, दरवर्षी तीनचार वेळा किचकट टाईम टेबल करावे लागायचे दोन्ही शिप्टचे. घरी



नेऊन आखणी, आणि हिशोब करुन प्रत्येक शिक्षकाला त्यांच्या रकान्यात बसवावे लागायचे. कधी कोणी मोठ्या रजेवर किंवा, बदलीवर गेले की पुन्हा एकदा नऊ तासिका, आणि दोन्ही शिप्टच्या शिक्षकांची रदबदली करण्यात कितीतरी दिवस डोक्याला ताप व्हायचा. असो एकेक गमतीदार किस्से. वर्षाच्या शेवटी रिझल्ट लावण्याचा जो प्रकार असायचा तेथेही खूप डोकेदुखी असायची. पण त्याहीपेक्षा तसे आवडीचे पण कंबरमोडीचे काम म्हणजे सतत फलक लेखन, मोठमोठे आडवे फलक स्टूलवर उभे राहून प्रत्येक वेळी खालीवर चढत, अक्षर आणि विषयानुसार चित्रे काढत करावे लागायचे. सुंदर अक्षराचा फायदा त्यावेळेस झाला, आता गुडघे, आणि कंबरदुखी ने ताबा घेतला. असो.

स्वप्नगंधा सतीश आंबेतकर
कला शिक्षिका, विरार मुंबई
मो. 97301 74088

आणि सर्वात मोठी गम्मत म्हणजे. दरवर्षी विज्ञान प्रदर्शन ,कला प्रदर्शन, क्रीडा महोत्सवआणि अनेक कार्यक्रमांसाठी आम्हा कला शिक्षकांना जातीने हजर राहून कार्यक्रमाची रूपरेषा व पूर्ण महोत्सव होईपर्यंत तेथे सतत काहीना काही काम असायचेच. वेगवेगळ्या शाळेत सर्व कार्यक्रमाची सर्टिफिकेट आणि इतर सजावट करावी लागायची.

आणि आमच्या स्पर्धाचित्रे जेंव्हा बाहेर गावी पाठवली जायची, आणि सुंदर कलाविष्कारांची पारितोषिक प्राप्त प्रमाणपत्रे, ट्रॉफी जेव्हा कशातरी, बर्या अक्षरात लिहिलेली यायची तेव्हा थोडे वाईट वाटायचे. आम्ही मात्र तीन दिवस घालवून सुंदर अक्षरात एवढी प्रमाणपत्रे लिहित असू.

सतत शाळेत कार्यक्रम, लेखन, सजावट, शिकवणे, स्पर्धा काहीतरी असायचेच. खूप छान वाटायचे, मुलांच्या गराड्यात, रोज नवीन काहीतरी शिकवायला मिळायचे. तो आनंदही होताच, असेच मी या कला विश्वात भारावून जाते, वेगवेगळ्या कडू गोड आठवणी असतात, आपण सतत काहीतरी शिकत असतो, शिकवत असतो. मन, तन क्रियाशील राहते. मला कायम विद्यार्थी आणि शिक्षक या दोन्ही भूमिका करायला आवडेल. आज पुन्हा एकदा मी शाळेत जाऊन आले, सारा शालेय नोकरीत ला चित्रपट डोळ्यासमोर तरळला.अशा अनेक आठवणी माणसाच्या मनात घर करुन राहतात. याला जीवन ऐसे नांव!

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559